## प्रवेशासाठी किमान अर्हता

**प्रथमा -** आयुर्वेदाचार्य प्रथम वर्षाची परीक्षा दिलेली असणे

**द्वितीया -** आयुर्वेदाचार्य द्वितीय वर्षाची परीक्षा दिलेली असणे

**तृतीया -** आयुर्वेदाचार्य तृतीय वर्षाची परीक्षा दिलेली असणे

## अभ्यासक्रम

**वर्ष -** प्रथमा
**संहिता अध्ययन -** अ. हृ. सूत्र, शारीरस्थान
**टीका वाचन -** अ. हृ. सू. ९, मा. नि. १
**पाठान्तर -** भा. प्र. - गुडूच्यादि वर्ग, अ. हृ सू. ९, १०

**वर्ष -** द्वितीया
**संहिता अध्ययन -** अ. हृ. निदान, चिकित्सास्थान
**टीका वाचन -** अ. हृ. शा. ३
**पाठान्तर -** अ. हृ. सू. १६ ते २०

**वर्ष -** तृतीया
**संहिता अध्ययन -** अ. हृ. संपूर्ण
**टीका वाचन -** अ. हृ. सू. १
**पाठान्तर -** अ. हृ. सू. १३ ते १५



## संपर्क


**वैद्य सौ. माधवी गाडगीळ**
९४२२०६७१७७

**वैद्य संजय पेण्डसे**
०२० - २५४३७९७९

**वैद्य विवेक साने**
९८९०१९१७२०
drvdsane@vsnl.net

**वैद्य सौ. स्वाती कुलकर्णी**
९९२२०७०९००
drswatikulkarni2007@gmail.com


### आवेदनपत्रासाठी संपर्क


**पुनर्वसु चिकित्सालय**
स्नेह, ९९२-९३/२७, नवी पेठ,
राजेन्द्र नगर, सेनादत्त पोलीस चौकीजवळ,
पुणे - ४११ ०३०
फोन - ०२० - २४५३२३२३


।। श्रीः ।।



**विद्यार्थीमित्र वैद्य मा. वा. कोल्हटकर**
**आयुर्वेद प्रतिष्ठान संचालित**

# श्री माधवाचार्य गुरुकुल



प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

आदरणीय गुरुवर्य कै. वैद्य कोल्हटकर सरांच्या अनेक आयुर्वेदीय संकल्पनांना मूर्त स्वरूपात साकारण्याच्या उद्देशाने सन १९९२ पासून विद्यार्थीमित्र वैद्य मा. वा कोल्हटकर आयुर्वेद प्रतिष्ठान कार्यरत आहे हे आपणास विदित आहेच. आयुर्वेदीय विषयांवर व्याख्याने, दररोज सकाळी धर्मचैतन्य येथे चालणारे अध्यापन असे अनेक उपक्रम प्रतिष्ठान यशस्वीपणे चालवीत आहे.

निष्णात शुद्ध आयुर्वेदीय चिकित्सक घडवून त्यांनी अनेक सुसज्ज व परिपूर्ण आयुर्वेदीय रुग्णालये उभारणे, आयुर्वेदीय प्रश्नांना आयुर्वेदीय परिभाषेत उत्तरे शोधणारे संशोधन आयुर्वेदीय पद्धतीने करणे, विद्यार्थ्यांना आयुर्वेदीय अभ्यास व चिकित्सेसाठी प्रवृत्त करणारा अध्यापक वर्ग घडविणे, गुणवत्तापूर्ण ग्रन्थोक्त औषधे वैद्यांसाठी उपलब्ध करणारे औषधी निर्माते घडविणे अशा अनेक संकल्पना सर बोलताना सांगत. परंतु आयुर्वेदाच्या ध्येयाने प्रेरित सक्षम विद्यार्थी घडविणे ही या सर्व संकल्पनांच्या मुळाशी असलेली संकल्पना होती. ही संकल्पना साकारण्यासाठी संपूर्ण भारतीय पद्धतीची शिक्षण-परंपरा पुनरुज्जीवित होणे आवश्यक होते. त्याच उद्देशाने आयुर्वेदीय संहितांचे प्राचीन भारतीय गुरुकुल पद्धतीने शिक्षण देणा-या श्री माधवाचार्य गुरुकुलाची स्थापना करण्यात आली. हा उपक्रम गेल्या सहा महिन्यांपासून चाललेला असून, अशा पद्धतीने आत्तापर्यंत तृतीया व प्रथमा अशा दोन अभ्यासवर्गांचे यशस्वी संयोजन करण्यात आले. या दोनही अभ्यासवर्गांचे विद्यार्थी व वैद्यवर्गाने उत्स्फूर्त स्वागत केले. असाच प्रतिसाद यानंतरच्या अभ्यासवर्गांनाही आपणाकडून मिळेल असा विश्वास वाटतो. आपल्या उत्फूर्त प्रतिसादाच्या अपेक्षेत,

**वैद्य प्रज्ञा कोल्हटकर** — अध्यक्षा

**वैद्य प्रमोद कुलकर्णी** — सचिव

**वैद्य दिलीप गाडगीळ** — गुरुकुल प्रमुख

## गुरुकुलाचे ध्येय

आयुर्वेदाचे संहिताधारित शिक्षण देऊन निष्णात चिकित्सक, अध्यापक, संशोधक व औषधी निर्माते घडविणे.

## गुरुकुल कार्यपद्धती

१) विद्यापीठाच्या परीक्षेनंतरच्या सुट्टीच्या कालावधीत सुमारे एक महिन्याचा संपूर्ण निवासी अभ्यासवर्ग आयोजित केला जातो. तारखांचे निश्चितीकरण परीक्षांच्या तारखांनुसार करण्यात येते. (प्रथमा व तृतीया – प्रत्येक वर्षी प्रायः जानेवारी महिन्यात व द्वितीया – प्रत्येक वर्षी प्रायः जून महिन्यात)

२) अभ्यासक्रमात संहिता अध्ययन, टीकावाचन, विवरण, अनुभव कथन, पाठान्तर, योगाभ्यास, वनस्पती दर्शन, औषधीनिर्माण प्रात्यक्षिके, आयुर्वेदीय संगणकप्रणालींचा परिचय इत्यादींचा अन्तर्भाव असतो.

३) तीन ते चार अध्यापकांचा समूह किमान तीन दिवस अध्यापनार्थ विद्यार्थ्यांच्या पूर्णवेळ सान्निध्यात असतो.

४) संपूर्ण कालावधीसाठी पूर्णवेळ किमान दोन समन्वयक विद्यार्थ्यांबरोबर असतात.

५) अभ्यासवर्गासाठी केवळ २० विद्यार्थ्यांची निवड केली जाते.

६) यासाठी विशिष्ट मुदतीत आवेदनपत्रे भरणा-या विद्यार्थ्यांची आयुर्वेदाची आवड, समज, शारीरिक-मानसिक क्षमता, पाठान्तर, वैद्यांकडील अनुभव इत्यादी मुद्यांच्या आधारे मुलाखत घेण्यात येते.

७) निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी महिनाभर स्वयंशिस्तीने गुरुकुलात राहून शिक्षण घेणे अपेक्षित असते. या कालावधीत गुरुकुल संकुल सोडण्यास अनुमती दिली जात नाही.

## गुरुकुल वैशिष्ट्ये

१) शहरी आकर्षणांपासून दूर, शान्त, निसर्गरम्य परिसरात व प्रसन्न वातावरणात गुरुकुलाचे आयोजन

२) सुट्टी सार्थकी लागल्याचा आनंद देणारे चाकोरीबाहेरील अध्यापन

३) अध्यापनार्थ आदरणीय वैद्य कोल्हटकर सरांच्या प्रेरणेने कार्यरत असणारा तज्ज्ञ व अनुभवी वैद्यसमूह

४) शिस्तबद्ध, वक्तशीर, नेटके व गुरुशिष्य परंपरेची बांधणी करणारे संयोजन

५) निःशुल्क अध्यापन

६) केवळ निवास व भोजन शुल्क आकारणी